**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी अर्ज मागे घ्यायची प्रक्रिया सुरू, काही उमेदवारांच्या बिनविरोध विजयाची निश्चिती

- विकसित भारत जी-राम जी’ योजनेत शेती आणि रोजगार हमी यांचा योग्य समतोल साधला असल्याचं केंद्रीय कृषिमंत्र्यांचं प्रतिपादन

- ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला साताऱ्यात सुरूवात

**आणि**

- शौर्यदिनानिमित्त भीमा कोरेगाव इथं विजयस्तंभाला लाखो नागरिकांचं अभिवादन

**<><><><><><>**

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आज अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया सुरू झाली. तसंच काही ठिकाणचे अर्ज बाद झाल्याने काही उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

नाशिकमधे भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसने काही ठिकाणी दोन उमेदवारांना एबी फॉर्म दिल्यामुळे हे अर्ज बाद झाले आहेत. मालेगाव महानगरपालिकेत प्रभाग ६ मधे प्रतिस्पर्धी पक्षांचे उमेदवारी अर्ज बाद झाल्याने इस्लाम पार्टीच्या उमेदवार मुनीरा शेख या बिनविरोध निवडून आल्या. मालेगाव महानगरपालिकेत दाखल अर्जापैकी १५  अर्ज अवैध ठरवण्यात आले आहेत. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत शिवसेनेचे तीन आणि भाजपाचा एक उमेदवार बिनविरोध निवडून येणार हे स्पष्ट झालं आहे. त्यामुळे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत बिनविरोध निवडून येणाऱ्या उमेदवरांची संख्या आता आठ झाली आहे.

जळगाव महानगरपालिकेतल्या दाखल अर्जांपैकी २१२ अर्ज बाद झाले. तसंच प्रतिस्पर्धी उमेदवारांचे अर्ज बाद ठरल्याने प्रभाग क्रमांक १२ ब मधल्या भाजपा उमेदवार उज्ज्वला बेंडाळे यांचा बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे. धुळे महानगरपालिकेत प्रभाग क्रमांक १७ ब मधे दोन अपक्ष उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने भाजपाच्या उमेदवार सुरेखा उगले यांचा बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला. याआधीच दोन उमेदवार बिनविरोध निवडले गेल्यामुळे धुळ्यातून भाजपाच्या तीन उमेदवारांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे.

**<><><><><>**

महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपमधल्या नाराज पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी चर्चा करून अपक्ष अर्ज मागे घेतले जातील, अशी ग्वाही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. नागपूर इथे ते माध्यमांशी बोलत होते. काही कारणांमुळे नाराज झालेले कार्यकर्ते पक्षासाठीच काम करतील अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. पुण्यात गुन्हे दाखल असलेल्या उमेदवारांना संधी दिल्याच्या प्रश्नावर, केवळ गुन्हा दाखल असणं आणि न्यायालयात दोष सिद्ध होणं या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. त्यामुळे या उमेदवारांबद्दल न्यायालयाचा निकाल आल्यानंतरच भाष्य करता येईल असं बावनकुळे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी काँग्रेसचं उद्दिष्ट मुंबईला भ्रष्टाचारमुक्त करून पारदर्शक आणि जबाबदार प्रशासन देण्याचं आहे, असं मुंबई काँग्रेस अध्यक्ष वर्षा गायकवाड म्हणाल्या. त्या आज मुंबईत माध्यमांशी बोलत होत्या. सत्ताधारी महायुतीने गेली अनेक वर्षं मुंबई महापालिकेच्या प्रशासनात राहून मुंबईकरांच्या हक्कांचं दमन केलं असून त्यांच्या पैशाची लूट केल्याचा आरोपही वर्षा गायकवाड यांनी केला. महायुतीने २०२२पासून प्रशासकाची नेमणूक करून महापालिकेच्या मुदत ठेवीतले १२ हजार कोटी रुपये लाटल्याचा आरोपही त्यांनी केला.

<><><><><><>

'विकसित भारत जी-राम जी' योजनेत शेती आणि रोजगार हमी यांचा योग्य समतोल साधला असल्याचं प्रतिपादन, केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलं आहे. ते आज अहिल्या नगर जिल्ह्यात राहाता तालुक्यातल्या लोणी बुद्रुक इथं 'विकसित भारत जी-राम जी' अभियानांतर्गत आयोजित विशेष ग्रामसभेत बोलत होते.

***होल्ड... बाईट- शिवराज सिंह चौहान***

या नव्या योजनेत, लवचिक धोरण स्वीकारलं असून, ज्यावेळी शेतीच्या पीक पेरणी-कापणी वगैरे कामांचा हंगाम असेल, त्यानुसार वर्षातले ६० दिवस या योजनेची कामं बंद राहतील. त्यामुळे शेतीकामासाठी मजूर उपलब्ध होतील आणि शेतकऱ्यांचं नुकसान टळेल. दुसरीकडे मजुरांना त्यांच्या घामाचा दाम वेळेवर मिळण्यासाठी या योजनेत अत्यंत कडक तरतुदी केल्या आहेत. काम संपल्यापासून एका आठवड्याच्या आत किंवा जास्तीत जास्त १५ दिवसांत मजुरी थेट बँक खात्यात जमा होईल. प्रशासकीय कारणानं १५ दिवसांत पैसे मिळाले नाहीत, तर मजुराला ५ शतांश टक्के दरानं व्याजासह रक्कम देण्याची तरतूद यात आहे. तसंच, काम मागूनही प्रशासनाला रोजगार देता आला नाही, तर 'बेरोजगारी भत्ता' देणं यापुढे कायद्यानं अनिवार्य असेल, असं त्यांनी सांगितलं. महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के यावेळी उपस्थित होते.

<><><><><><>

बीड जिल्ह्यात उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज सहकार संकुलाच्या भूमिपूजनासह ५७५ कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांचा प्रारंभ केला. बीड जिल्ह्यात पहिल्यांदाच जवळपास १ हजार २१६ विविध विकासकामांची सुरुवात झाली. यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यासह विविध सरकारी कर्मचारी, अधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

**<><><><><><>**

९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला आज साताऱ्यात सुरुवात झाली. साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी आणि मावळत्या अध्यक्ष डॉक्टर तारा भवाळकर यांच्या हस्ते ध्वजारोहण, तसंच ग्रंथप्रदर्शनाचं उद्घाटन झालं.

संमेलनाचं औपचारिक उद्घाटन उद्या ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉक्टर मृदुला गर्ग यांच्या हस्ते होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर, संमेलनाचे नियोजित अध्यक्ष ज्येष्ठ लेखक विश्वास पाटील समारंभाला उपस्थित राहतील.

**<><><><><><>**

नववर्षाचं स्वागत देशभरासह राज्यात आनंदात आणि उत्साहात झालं. **मुंबईत** गेटवे ऑफ इंडिया, मरीन ड्राइव्ह, गिरगाव, दादर, जुहू चौपाटी, आणि इतर सार्वजनिक ठिकाणी नागरिकांनी एकत्र येऊन मोठ्या जल्लोषात नववर्षाचं स्वागत केलं. नव्या वर्षाच्या पहाटे आज मुंबईत पावसानं हजेरी लावली. त्यामुळे वातावरणात गारवा पसरला. राज्यातल्या विविध भागातही नागरिकांनी नववर्षाचं स्वागत केलं.

**नागपूरकरांनी** प्रसिद्ध गणेश मंदिरात दर्शन घेऊन नववर्षाची सुरुवात केली.

**वाशीममध्ये** सामाजिक संस्थांच्या कार्यकर्त्यांनी शहरातले महापुरुषांचे पुतळे स्वच्छ करून त्यांना पुष्पहार अर्पण करून आगळ्यावेगळ्या पद्धतीनं नववर्षाचं स्वागत केलं.

**नंदुरबारमधे** श्रॉफ हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी सामूहिक सूर्यनमस्कार घालून नवीन वर्षाचं स्वागत केलं.

**गोंदियामधे** नागरा धाम मंदिरातल्या पंचमुखी शिवलिंगाच्या दर्शनासाठी, तसंच सिव्हिल लाईन भागातल्या हनुमानाचं दर्शन घेण्यासाठी सकाळपासून भाविकांची मोठी रांग लागली होती.

**गणपतीपुळे** इथं वर्ष अखेरी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या जिल्हा स्तरीय सरस प्रदर्शनात ६३ हजार रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या उत्पादनांची विक्री झाली. या प्रदर्शनाला पर्यटकांचाही चांगला प्रतिसाद लाभला.

**<><><><><><>**

पुणे जिल्ह्यात ‘भीमा कोरेगाव’ इथं आज शौर्यदिन साजरा होत आहे. या ठिकाणी असलेल्या विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी लाखो नागरिकांनी मोठी गर्दी केली आहे. ऐतिहासिक विजयस्तंभावर केलेली फुलांची आकर्षक सजावट सर्वांचं लक्ष वेधून घेत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भीमा कोरेगावच्या शौर्यस्तंभाला अभिवादन केलं. वाशिममधल्या त्रिदीप माजी सैनिक संघटनेच्या वतीने तसेच शहरातल्या आंबेडकरी जनतेच्या वतीने भीमा कोरेगाव विजय स्तंभाच्या प्रतिकृतीवर पुष्पचक्र वाहून मानवंदना देण्यात आली.

विजय दिनाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेसाठी ५ हजार पोलीस तैनात करण्यात आले आहेत.

**<><><><><><>**

डिसेंबर २०२५ मध्ये जीएसटी, अर्थात वस्तू आणि सेवा कराचं एकंदर संकलन सुमारे एक लाख ७५ हजार कोटी रुपयांवर पोहोचलं आहे. गेल्या वर्षीच्या या कालावधीच्या तुलनेत ही वाढ ६ पूर्णांक १ दशांश टक्के आहे. डिसेंबर २०२४ मध्ये जीएसटी संकलन १ लाख ६४ हजार कोटी रुपये इतकं होतं.

डिसेंबर २०२५ मध्ये केंद्रीय जीएसटी संकलन ३४ हजार २८९ कोटी रुपये, तर राज्य जीएसटी संकलन ४१ हजार ३६८ कोटी रुपये इतकं होतं.

**//<><><><><><>//**